स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांची पुनर्रचना

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ ऑक्टोबर, २००५.

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त होतात की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांच्या (महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषदांचे मतदार गट व पंचायत समित्यांचे मतदार गण) पुनर्रचनेच्या कामात राजकीय पुढा-यांचा हस्तक्षेप होतो. तरी असा हस्तक्षेप टाळण्यासाठी व प्रभाग रचना राजकीय प्रभावाखाली होऊ नये यासाठी मतदार संघांच्या पुनर्रचनेचे काम प्रारंभिक म्हणजे प्रारुप मतदार संघ तयार करण्याचे काम गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे. कोणत्याही राजकीय पक्षाने अथवा पुढा-याने अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्याने त्याबाबतची माहिती मागितल्यास ती देण्यात येऊ नये. अशा सूचना सर्व मतदार संघांच्या पुनर्रचनेच्या कामकाजाशी संबंधित असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात याव्यात. अशी माहिती मिळाल्यास राजकीय पुढा-यांकडून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांकडून मतदार संघांची पुनर्रचना कशी करावी यासंबंधी सूचना देण्यात येतात व त्या सूचनांचे काही वेळा पालनही होते. मतदार संघाच्या रचनेवर ब-याचदा आरक्षण अवलंबून असते विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे. कोणत्याही अधिकाऱ्याने/कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरीत सुरु करण्यात यावी. प्रारुप मतदार संघ ज्यावेळी जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येतात त्यावेळी सर्व संबंधितांना प्रस्तावाची माहिती होतेच.

\\Mc-mac\c\Documents and Settings\PATIL\My Documents\aab-prabhag rachana aadesh.doc

२.    माहितीच्या अधिकाराखाली कोणत्याही नागरिकांने प्रभाग रचनेची माहिती मागितल्यास अशी माहिती देण्यात येऊ नये. कारण माहितीचा अधिकार अशा बाबींना लागू होतो की, ज्यात निर्णय झाला आहे.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

\\Mc-mnc\c\Documents and Settings\PATIL\My Documents\sub-prabhag rachana aadesh.doc